मार्गदर्शन

# कांदा लागवडीचं जाणून घ्या तंत्र



**नीलिमा गोबाडे**
**माधवी भालाधरे**
आचार्य पदवी विद्यार्थिनी,
वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी



कांदा हे हिवाळी हंगामातील पीक असून महाराष्ट्रातील सौम्य हवामानात कांद्याची २ ते ३ पिके घेतली जातात. कांदा पिकासाठी लागवडीपासून १ ते २ महिने हवामान थंड असावे लागते. महाराष्ट्रात कांद्याचे पीक खरीप आणि हिवाळी हंगामात घेतले जाते. कांद्याच्या उत्तम वाढीसाठी ५ ते २५ अंश सेल्सिअस तापमान आणि ७० % आर्द्रता आवश्यक असते.

कांदा हे व्यापारीदृष्ट्या सर्वात महत्त्वाचे भाजीपाला पीक आहे. भारतीयांच्या आहारात कांद्याचा वापर केला जातो. कांदा पिकविणाऱ्या राज्यात क्षेत्र व उत्पादनाच्या बाबतीत महाराष्ट्र अग्रस्थानी आहे. महाराष्ट्रामध्ये अंदाजे १.०० लाख हेक्टरवर कांद्याची लागवड केली जाते. नाशिक, पुणे, सोलापूर, जळगाव, धुळे, अहमदनगर, सातारा हे जिल्हे कांदा पिकविण्याबाबत प्रसिध्द आहेत. तसेच मराठवाडा, विदर्भ व कोकणातसुध्दा काही जिल्ह्यांमध्ये कांद्याची लागवड केली जाते. नाशिक जिल्हा हा महाराष्ट्रातच नव्हे तर सबंध भारतात कांदा पिकविण्यात प्रसिध्द आहे. एकूण उत्पादनापैकी महाराष्ट्रातील ३७ टक्के तर भारतातील १० टक्के कांद्याचे उत्पादन एकट्या नाशिक जिल्ह्यात घेतले जाते.

**हवामान** : कांदा हे हिवाळी हंगामातील पीक असून महाराष्ट्रातील सौम्य हवामानात कांद्याची २ ते ३ पिके घेतली जातात. कांदा पिकासाठी लागवडीपासून १ ते २ महिने हवामान थंड असावे लागते. महाराष्ट्रात कांद्याचे पीक खरीप आणि हिवाळी हंगामात घेतले जाते. कांद्याच्या उत्तम वाढीसाठी ५ ते २५ अंश सेल्सिअस तापमान आणि ७० % आर्द्रता आवश्यक असते.

**जमीन** : पाण्याचा उत्तम निचरा असणारी भुसभुशीत जमीन व सेंद्रिय खतांनी परिपूर्ण असलेली मध्यम ते कसदार जमीन कांद्याला चांगली मानवते.

**पूर्वमशागत** : जमिनीची उभी आडवी नांगरणी करून कुळवाच्या पाळ्या देऊन ढेकळे फोडून जमीन भुसभुशीत करावी. जमिनीत हेक्टरी ४० ते ५० टन शेणखत मिसळावे.

**लागवड हंगाम** : महाराष्ट्रात कांद्याची लागवड खरीप हंगामात जून ते ऑक्टोबर, रब्बी हंगामात नोव्हेंबर ते फेब्रुवारी आणि उन्हाळी हंगामात जानेवारी ते जून महिन्यांत करतात.

**विविध जाती** :- खरीप व रब्बी हंगामासाठी बसवंत ७८० ही जात योग्य असून या जातीचा रंग गडद लाल असतो. ही जात १०० ते ११० दिवसांत तयार होते. हेक्टरी उत्पादन २५० ते ३०० क्विंटल मिळते.

एन-५३ : ही जात खरीप हंगामासाठी योग्य आहे. १०० ते १५० दिवसांत तयार होते. या जातीचा रंग लालभडक असतो. हेक्टरी उत्पादन २०० ते २५० क्विंटल मिळते.



**एन-२-४-१** : ही जात रब्बी हंगामासाठी योग्य असून रंग भगवा आहे. कांदा आकाराने मध्यम गोल असून साठवणुकीत हा कांदा अतिशय चांगल्या प्रकारे टिकतो. ही जात १२० ते १३० दिवसांत तयार होते. हेक्टरी उत्पादन ३०० ते ३५० क्विंटल मिळते.

**पुसा रेड** : कांदे मध्यम आकाराचे विटकरी लाल गोलाकार मध्यम तिखट असतात. लागवडीपासून १२० दिवसांत तयार होतात. हेक्टरी उत्पादन २५० ते ३०० क्विंटल मिळते. बियाण्याचे प्रमाण : हेक्टरी कांद्याचे १० किलो बियाणे पुरेसे असते.

**लागवड** : कांद्याची रोपे, गादी वाफे तयार करणाऱ्या क्षेत्राची खोल नांगरट करून कुळवाच्या दोन- तीन पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करावी. गादी वाफा १ मीटर रूंद ३ मीटर लांब, १५ सें.मी. उंच करावा. वाफ्यातील ढेकळे निवडून बाजूला काढावीत. वाफ्याच्या रूंदीशी समांतर अशा ५ सें.मी. बोटाने रेषा पाडाव्यात आणि यात बी ओळीत पातळ पेरावे व नंतर मातीने झाकून टाकावे. बी उगवून येईपर्यंत झारीने पाणी घालावे. बी उगवल्यानंतर गरजेप्रमाणे पाटाने पाणी द्यावे. फुलकिडे व करपा यांच्या नियंत्रणासाठी १० लिटर पाण्यात १५ मि.ली. मोनोक्रोटोफॉस व २५ ग्रॅम डायथेन एम. ४५

तसेच ५० ग्रॅम युरिया दर १० दिवसांच्या अंतराने ४ ते ५ फवारण्या कराव्यात. रोपांना हरभऱ्यासाठी गाठ तयार झाली की रोप लागवडीस योग्य समजावे. खरीप कांद्याची रोपे ६ ते ७ आठवड्यांनी व रब्बीची ८ ते ९ आठवड्यांनी तयार होतात. रोपे काढण्यापूर्वी २४ तास अगोदर गादी वाफ्यास पुरेसे पाणी द्यावे. कांद्याची लागवड गादी वाफ्यावर तसेच सरी वरंब्यावर करता येते. सपाट वाफ्यामध्ये हेक्टरी रोपांचे प्रमाण जास्त असले तरी मध्यम आकाराचे एकसारखे कांद्याचे उत्पादन मिळते. सपाट वाफा दोन मीटर रूंद व उताराप्रमाणे वाफ्यांची लांबी ठेवावी. रोपांची लागवड सकाळी अथवा संध्याकाळी करावी. रोपांची लागवड १२.५ बाय ७.५ सेमी अंतरावर करावी.



खते व पाणी व्यवस्थापन : कांदा पिकास हेक्टरी ५० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश लागवडीच्या वेळी घ्यावे. त्यानंतर १ महिन्याने ५० किलो नत्र प्रतिहेक्टरी द्यावे. कांदा पिकाला नियमित पाणी देणे महत्त्वाचे असते. खरिप हंगामात १० ते १२ दिवसांच्या अंतराने तर उन्हाळी रब्बी हंगामात ६ ते ८ दिवसांनी जमिनीच्या मगदुराप्रमाणे पाणी द्यावे.

**आंतरमशागत** : रोपांच्या लागवडीनंतर शेतात तण दिसल्यास हलकी खुरपणी करावी. काढणीपूर्वी ३ आठवड्याअगोदर पाणी बंद करावे म्हणजे पानातील रस कांद्यामध्ये लवकर उतरतो व माना पडून कांदा काढणीस तयार होतो.

**रोग व कीड** : कांद्यावर प्रमुख रोग म्हणजे करपा हा रोग बुरशीपासून होतो. पातीवर लांबट गोल तांबूस चट्टे पडतात. शेंड्यापासून पाने जळल्यासारखी दिसतात. खरीप कांद्यावर या रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. फूलकिडे किंवा अळ्या हेक्टरी अगदी लहान आकाराचे कीटक पातीवरील तेलकट पृष्ठभाग खरडतात व त्यातील रस शोषतात. त्यामुळे पातीवर पांढरे ठिपके पडतात.

**उपाय** : फुलकिडे व करपा रोगाच्या नियंत्रणासाठी दोन- तीन आठवड्यांनी हेक्टरी फॉस्फॉमिडॉन ८५ डब्यूडी.एस.सी. १०० मि.ली. किंवा मोनोक्रोटोफॉस ३६ डल्ब्यू.पी.एस.सी. ५५० मि.ली. ५०० लिटर पाण्यात मिसळून पहिली फवारणी करावी. पहिल्या फवारणीनंतर तीन- चार आठवड्यांनी दुसरी फवारणी करावी. या फवारणीच्या वेळी प्रतिहेक्टरी कॉपर ऑक्झिक्लोराईड ५० डब्ल्यू.पी. १२५० ग्रॅम ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

**काढणी व उत्पादन** : कांद्यांचे पीक लागवडीनंतर ३ ते ४.५ महिन्यांत काढणीस तयार होते. कांद्याची पात पिवळी पडून कांदा मानेत पिवळा पडतो व पात आडवी पडते. यालाच मान मोडणे असे म्हणतात. ६० ते ७५ टक्के माना मोडल्यावर कांदा काढणीस पक्व झाला असे समजावे. कुदळीच्या साहाय्याने आजूबाजूची जमीन सैल करून कांदे उपटून काढावेत. काढणीनंतर ४ ते ५ दिवसांनी कांदा पाती सकट शेतात लहान लहान ढिगाऱ्याच्या रूपाने ठेवावा. नंतर कांद्याची पात कापावी. पात कापताना ३ ते ४ सें.मी. लांबीचा देठ ठेवून पात कापावी. यानंतर कांदा ४ ते ५ दिवस सावलीत सुकवावा. हेक्टरी उत्पादन २५० ते ३०० क्विंटल मिळते.

## कांद्याचे विविध उपयोग

कांद्यामध्ये पांढरा व लाल अशा दोन जाती आढळतात. पांढरा कांदा गुणवत्तेच्या दृष्टीने उत्तम असतो व औषधासाठीही त्याचा उपयोग केला जातो. कोणी लाल कांदा तर कोणी पांढरा कांदा गुणवत्तेच्या दृष्टीने उत्तम समजतात. लाल कांद्यात लोहतत्त्व जास्त असते. वांगी, बटाटे, कारली यासारख्या भाज्यांत कांदा घालून मिश्र भाजी बनवली असता स्वादिष्ट लागते. पातीच्या कांद्याचीही भाजी होते. फोडणीसाठीही कांद्याचा उपयोग केला जातो. याशिवाय कोशिंबीर व लोणचे बनविण्यासाठीही कांद्याचा उपयोग होतो. कच्च्या कैरीत कांदा, गूळ व इतर मसाला घालून कोशिंबीर आणखी स्वादिष्ट लागते. कांद्याची कोंशिबीर पावसाळ्यातही पाचक समजली जाते. उन्हाची झळ लागू न देण्याचा एक विशिष्ट गुण कांद्यात आहे. त्यामुळे सूर्याच्या प्रखर उष्णतेचा शरीरावर विपरीत परिणाम होत नाही. ■